# प्रस्तावना

" वाळवा तालुका कारागिर विकास (विविध कार्यकारी सहकारी) ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास " हा प्रबंध माझ्या आई-वडिलांच्या आशिर्वादाचे व गुरुवर्यांच्या प्रेरणेचे मूर्त स्वरूप आहे. कोणतेही चांगले कार्य करावयाचे असल्यास त्यास सहकार्याची जोड आवश्यक असते. सहकार्याशिवाय कोणतीही वाटचाल पूर्ण होत नाही. मला शोध प्रबंध पूर्ण करणेसाठी अनेकांचे सहकार्य लाभले आहे. त्यांचा ऋणनिर्देश करणे हे माझे परमकर्तव्य ठरते.

या कामी माझे संशोधक मार्गदर्शक मा.डॉ. पी.बी.कुलकर्णी, प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली यांनी माझ्यावर कृपाकटाक्ष ठेवला, त्यांचे मार्गदर्शन, त्यांची प्रेरणा, जिव्हाळा माझ्या कार्यात सतत चैतन्य देणारा राहिला. त्यांनी माझेसाठी दिलेला बहुमूल्य वेळ व वेळोवेळी केलेल्या महत्वपूर्ण सूचना यामुळेच प्रबंध पूर्ण होऊ शकला. त्यांच्या प्रेमळ जिव्हाळ्याचा मौलिक व व्यासंगी मार्गदर्शनाचा मला लाभ झाला. त्यांच्या या सहकार्याबद्दल मी त्यांचे अंत:करणपूर्वक आभार मानत आहे.

प्रस्तुत प्रबंध लेखनाचे काम विविध अवस्थांमधून जात असताना अनेकांचे सहकार्य मला लाभले आहे. प्रामुख्याने ज्यांच्यामुळे हा प्रबंध पूर्ण करू शकलो ते वाळवा तालुका कारागिर विकास संघाचे सचिव मा. विलास बाबूराव फडतरे यांच्यात असलेल्या उत्साही व मुत्सद्दीपणाचा मला अतिशय लाभ झाला. त्यांनी आपला वेळ खर्च करून मला कार्यालयीन माहिती पुरविली त्यांच्या या सहकार्याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक ऋणी आहे. तसेच श्री.एच. आर. रासनकर, मुख्य लिपीक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, इस्लामपूर यांनी ही संघाची काही महत्वपूर्ण माहिती पुरविली त्यांचाही मी आभारी आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी डॉ. वि.बा. धुगे, माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर त्याच बरोबर डॉ. आर.आर. दोशी, अर्थशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. व्ही.बी. जुगळे, डॉ. ए.ए. डांगे, प्रा. व्ही.बी. ककडे, प्रा. पी.एन. गायकवाड, प्रा. आर.जी. दांडगे आदिंचे सहकार्य व प्रेरणा मिळाली त्यामुळे त्यांचे ऋणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

प्राचार्य आय.बी. तांबोळी, श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरुड यांचा आशिर्वाद, प्रा. एस.डी. साळुंखे, प्रा. बी.आर. गाडवे, प्रा. डी.जी. पाटील, प्रा. एच.एन. पवार, प्रा. पी.बी. पाटील, प्रा. ए.पी. देसाई, प्रा.सौ. एम.आर. पाटील, प्रा. एम.बी. पाटील, प्रा.जी.डी. कांबळे, प्रा. एस.एस. पाटील, प्रा. एम.बी. देवकर, प्रा. एम.एम. मोरे, श्री. टी.बी. पाटील, ग्रंथपाल सौ. आर.ए. थिटे यांच्या मौलिक सहकार्यामुळे मी माझा प्रबंध पूर्ण करू शकलो. त्यांचा शतश: ऋणी आहे.

सरतेशेवटी माझे थोरले बंधु श्री. गुरलिंग नाळे व कुटुंबातील लहान-थोर मंडळींनी एम्.फिल्. कोर्स पूर्ण करण्याची सुवर्णसंधी प्राप्त करून दिली विशेषत: पत्नी सौ. अनुराधा नाळे हिने स्वत:चा शिक्षणाचा व संसाराचा व्याप सांभाळून हा कोर्स पूर्ण करणेसाठी प्रोत्साहित केले. या सर्वांचे आभाराशिवाय प्रबंध अपूर्णच वाटत होता त्यांचेही आभार मानत आहे.

याशिवाय जाणता अजानता सहाय्यभूत झालेल्यांचे परंतु ऋण-निर्देश करता आला नाही अशांचे ही हार्दिक आभार मानत आहे.

(श्री. आर.के. नाळे)
संशोधक

कोल्हापूर
दिनांक : १६-११-१९९२